अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक:– २०/०१/२०२५

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४४/२०२५ भोईवाडा पोलीस ठाणे, भिवंडी |
| कलम | कलम ७, १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) सुनिल भास्कर भोईर, सहाय्यक आयुक्त,<br>२) अमोल रामचंद्र वारघडे, प्रभारी बीटनिरीक्षक,<br>नेमणूक :- प्रभाग क्रमांक ४, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, ठाणे |
| लाचेची मागणी | रू. १,५०,०००/- तडजोडीअंती रू. १,३०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ५०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे चारमजली बांधकाम असून सदरहू बांधकाम हे अनधिकृत असल्याबाबत लोकसेवक श्री. सुनिल भास्कर भोईर, सहाय्यक आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी निर्णयाद्वारे सुचित केले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेतली असता, लोकसेवक श्री. सुनिल भोईर यांनी अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. १,५०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/०१/२०२५ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन, सदर कारवाई ला.प्र.वि., मुंबई विभागाने करावी अशी विनंती करून लोकसेवकाविरूध्द तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांचेकडे अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती रू. १,३०,०००/- लाचेची मागणी करून त्यातील पहिला हप्ता म्हणून रू. ५०,०००/- दिनांक १८/०१/२०२५ रोजी स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे दिनांक १८/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. २ यांना लोकसेवक क्र. १ यांचे सांगणेवरून तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. ५०,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री गिरीश माणगांवे, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. रविंद्र लाभांते, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net